सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक पोलीस -११२२/ प्र. क्र. २२९/पोल-५अ, दि. २३/०३/२०२६

**विषय:-** महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर पोलीस उपनिरिक्षक संवर्गाची २२४ अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक पोलीस -११२२/ प्र. क्र.२२९/पोल-५अ, दि. २३/०३/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०३२३१६५०५०२१२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by S
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 25-03-2026 13:17:41

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक ५

प्रत सादर :-

विशेष पोलीस महानिरीक्षक, (आस्थापना) , महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे उप सहायक (आस्थापना-२), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “आस्थापना" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर पोलीस उपनिरीक्षक संवर्गाची २२४ अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : पोलीस- ११२२/प्र.क.२२९/पोल-५अ**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २३ मार्च, २०२६

वाचा :-

१) विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/५/१०/ससे पोउनि (मुख्य) परीक्षा -२०२३/७३/२०२४, दि.१६.०३.२०२६
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२०.०२.२०१६

प्रस्तावना:-

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा- २०२३ मधील, पोलीस उपनिरिक्षक मर्यादित विभागीय परीक्षा-२००८ मधील, मागील सत्रामधील मुदतवाढ दिलेले, चारित्र्य पडताळणी संदर्भात अमुस (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पात्र ठरविलेले, अशा एकूण २२४ उमेदवारांचे पोलीस उपनिरीक्षक पदाचे १२ महिन्यांचे मुलभूत प्रशिक्षण महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे प्रशिक्षण सत्र क्र.१२८ मध्ये दि.१०.०२.२०२६ पासून सुरु करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षाणार्थी पोलीस उपनिरीक्षकांचे वेतन व भत्ते अदा करण्याकरीता महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर पोलीस उपनिरीक्षक संवर्गाची २२४ अधिसंख्य पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा- २०२३ मधील, पोलीस उपनिरिक्षक मर्यादित विभागीय परीक्षा-२००८ मधील, मागील सत्रामधील मुदतवाढ दिलेले, चारित्र्य पडताळणी संदर्भात अमुस (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पात्र ठरविलेले अशा एकूण २२४ प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षकांचे वेतन व भत्ते अदा करण्यासाठी **महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर दि.१०.०२.२०२६ ते दि.१०.०२.२०२७ या कालावधीसाठी पोलीस उपनिरीक्षक संवर्गाची २२४ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

२. सदर अधिसंख्य पदे विविध पोलीस घटकांमध्ये पोलीस उपनिरीक्षकांच्या रिक्त असलेल्या पदांच्या अधिनतेने निर्माण करण्यात आली असल्याने सदर पोलीस उप निरीक्षकांची रिक्त पदे ज्या आस्थापनेवर आहेत त्या आस्थापनेवर वेतन काढले जाणार नाही याची खात्री करण्यात यावी.

३. याकरीता होणारा खर्च वित्तीय वर्ष सन २०२५-२६ व सन २०२६-२७ साठी " मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस, १०९ जिल्हा पोलीस दल, (००) (०१) जिल्हा पोलीस बल" या लेखाशिर्षाखाली संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांना मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय संदर्भ क्र.२ येथील वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक.पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २०.०२.२०१६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३२३१६५०५०२१२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GAIKWAD GANESH SUDAM

Digitally signed by GAIKWAD GANESH SUDAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=F88A2DF366DBF702EDA9179BFDD100F151490E691798947C7F6D1B8CF0DAB7D6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=0585EFA444AE7B29EC4D54E290F9F826C6E4DE96799148FCFC4C6E13F203B34E, cn=GAIKWAD GANESH SUDAM
Date: 2026.03.23 16:51:53 +05'30'

**( गणेश गायकवाड )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. अपर पोलीस महासंचालक (आस्थापना/प्रशासन), पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई
४. विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
५. संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
६. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र -१, मुंबई
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
९. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक
१०. निवडनस्ती (पोल-५अ)